सकाळ : दि. १०/०२/२०१६

# ‘ज्युनिअर रोबोकॉन’ ची नोंदणी सुरू

## एमआयटी ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरींग, माईर्स एमआयटी तर्फे आयोजन

पुणे, ता. ९ : एमआयटी ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरींग पुणे व माईर्स एमआयटी पुणे यांच्या लोणी काळभोर येथील विश्वशांती गुरूकुल शाळेतर्फे ३ ते ५ मार्चदरम्यान ‘ज्युनिअर रोबोकॉन २०१६’ चे आयोजन करण्यात येणार आहे. श्री. छत्रपती शिवाजी क्रिडा संकुल, बालेवाडीच्या बॅडमिंटन हॉलमध्ये ही स्पर्धा होणार आहे. यावर्षीची थीम ‘भारत २०२० – डिजिटल इंडिया’ अशी आहे.

स्पर्धा इयत्ता तिसरी ते ५ वी (गट – अ) व इयत्ता ६ वी ते ९ वी (गट – ब) अशा दोन गटांत होईल. सहभाग शुल्क प्रत्येकी ३ हजार असून, यांमध्ये विद्यार्थ्यांना रोबोटिक किट, वायरलेस कंट्रोल किट तसेच या किटव्दारे रोबोटस बनविण्याचे प्रशिक्षण बूट कॅम्पव्दारा देण्यात येईल.

याशिवाय ‘मेन इन इंडिया’ या थीमवर विद्यार्थ्यांनी घरी किंवा शाळेत बनविलेल्या रोबोट्साठी खुल्या गटातल्या स्पर्धा होतील. या गटात १५ वर्षापर्यंतचे सर्व विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. खुल्या गटातील स्पर्धकांना भारतीय बनावटीचा कच्चा माल वापरून केलेल्या रोबोट्सचे प्रात्यक्षिक दाखवावे लागेल. हे रोबोट्स यापुर्वी कुठेही प्रदर्शित केलेले नसावेत. या रोबोट्सची डिझाइन जास्तीत जास्त २५ चौ. सेंमी या आकारात असावी. खुल्या गटात दोन विद्यार्थ्यांसाठी १०००, तर पुढील प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांसाठी रू. ५००/– शुल्क असेल. अभिनव रोबोट्सना आकर्षक पारितोषिके देण्यात येतील. अधिक माहितीसाठी एमआयटी महाविद्यालयाशी संपर्क साधावा.